महाराष्ट्र शासन

क्रमांक: व्यशिअ-२०१७/(१०१/१७)/व्यशि-१
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक: १६ फेब्रुवारी, २०१८.

संदर्भ:-१) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होण्याऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.
२) शासनाचा समक्रमांकित दि. १४ जुलै, २०१७ रोजीचा आदेश.
३) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.३/आस्था-१/बदली/२०१७/ प्र.क्र.१०३, दि. २१ सप्टेंबर,२०१७.

आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ (३) मधील तरतुदीनुसार व सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ(क)(तां) रु.१५,६००-३९,१०० ग्रेड पे रु.५,४००/- या वेतनश्रेणीतील प्राचार्य/उपप्राचार्य, औ.प्र.संस्था/ मुख्याध्यापक, शा.तां.वि./सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तां.), निरीक्षक या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सन २०१७ च्या नियतकालीक बदल्या संदर्भाधिन क्र. २ वरील दि. १४.०७.२०१७ च्या शासन आदेशान्वये करण्यात आल्या होत्या.तथापि,सदर बदली आदेशातील अ. क्र.५ वरील श्री. एस. एम. मुसळे यांच्या पदस्थापनेत सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने प्रशासकीय कारणास्तव खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे :-

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव व सध्या कार्यरत असलेली संस्था/कार्यालय	सुधारीत पदस्थापना
१	२	३
१	श्री. एस. एम. मुसळे प्राचार्य, औ.प्र.संस्था,बार्शी , जि.सोलापूर.	निरीक्षक, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय, बीड, जि.बीड (रिक्त जागी)

२. सदरहू अधिका-यास शासनाच्या प्रचलीत नियमानुसार पदग्रहण अवधी व प्रवास भत्ता अनुज्ञेय राहील.

३. बदली झालेल्या अधिकाऱ्यांची रजा शासनाच्या परवानगी शिवाय मंजूर करण्यात येऊ नये.

४. सदर आदेश तात्काळ अंमलात आणावेत. संबंधित अधिकाऱ्यांना बदली केलेल्या ठिकाणी हजर होण्यासाठी विभाग प्रमुख यांनी तात्काळ कार्यमुक्त करावे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८०२१६१७३४०३२२०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sakharam Dina Kharat

Digitally signed by Sakharam Dina Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SD And E Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c6d1f4d2e41b8e84bb98ddddcac3054927f82f9c1a5810e2874cdac2c44c28c2, cn=Sakharam Dina Kharat
Date: 2018.02.16 17:41:03 +05'30'

(स.दि.खरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.

२) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.

३) सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय (सर्व संबंधितांना संचालकांमार्फत)

४) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.

५) महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

६) मा.मंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता) खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

७) मा.राज्यमंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

८) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.

९) जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व संबंधितांना संचालकांमार्फत)

१०) सर्व संबंधित अधिकारी (संचालकांमार्फत)

११) सर्व संबंधित कार्यालय/संस्था (संचालकांमार्फत)

१२) निवडनस्ती (व्यशि-१).